आर.सी.सी क्र.७९०/२०२५
सरकार विरुध्द हर्षकुमार व इतर
**निशाणी क्र.१८९/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक–२ यांची जबानी–**
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करते की,
**माझे नाव – श्रीमती शितल नितीन शिंदे,**
वय – ४४ वर्षे, व्यवसाय – नौकरी
निवासस्थान– द्वारकापुरी, छत्रपती संभाजीनगर.

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**
**विद्वान श्रीमती. राऊत एम. एस., सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –**

मी क्रिडा विभागामध्ये सेवा वर्ग दिनांक १३–०८–२०२४ रोजी झाले. मी स्काऊट ॲण्ड गाईड विभागात जिल्हा संघटक म्हणून कार्यरत होते. मी मुळ बीड जिल्ह्यात नियुक्त होते. तेथून माझी औरंगाबाद येथे सेवावर्ग नुसार बदली झाली. आमच्याकडे उपसंचालक हे कार्यालयीन प्रमुख असतात. त्यांच्या हाताखाली क्रिडाधिकारी, अधिक्षक, मुख्य लिपीक, दोन वरिष्ठ लिपीक, दोन कनिष्ठ लिपीक, वाहनचालक, शिपाई आणि बाह्य कंत्राटी कर्मचारी, असे काम करतात. आमच्या कार्यालयात एक निम्न श्रेणी लघुलेखक सुद्धा क्रिडाधिका–यासांठी असतात. कार्यालयात एक संगणक चालक आणि एक लेखा लिपीक म्हणून बाह्य कर्मचारी कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करतात. त्यावेळेला उपसंचालक पदाचा कार्यभार श्री संजय सबनिस यांच्याकडे होता. क्रिडाधिकारी हे तेजस कुलकर्णी म्हणून होते. लघुलेखक निम्न श्रेणी म्हणून श्री. ठाकूर हे होते. मुख्य लिपीक दिपक जगदाळे हे होते. वरिष्ठ लिपीक स्वप्नील तांगडे, आनंद थोरात, दिनेश मिसाळ होते. मी सुद्धा वरिष्ठ लिपीक या मध्ये येते परंतू माझे पद जिल्हा संघटक म्हणून आहे. कंत्राटी कर्मचा–यामध्ये संगणक चालक हर्षकुमार क्षिरसागर व लेखा लिपीक यशोदा शेट्टी या नियुक्त होत्या. माझ्याकडे राष्ट्रीय छात्र सेना याचा अधिभार देण्यात आला होता. त्यामध्ये एनसीसी गट प्रमुख कार्यालय, ५० महाराष्ट्र बटालियन बॉईज, ५१ महाराष्ट्र बटालियन बॉईज, ७ गर्लस महाराष्ट्र बटालियन छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयाचा एनसीसी कार्यालयाचा अधिभार सुध्दा माझ्याकडे होता. स्वप्नील तांडगे यांच्याकडे बँकेचे व्यवहार पाहणे व कॅश बुक लिहणे हे काम होते. स्वप्नील तांगडेच्या हाताखाली संगणक चालक म्हणून हर्षकुमार क्षिरसागर व यशोदा शेट्टी या लेखा लिपीक म्हणून काम पाहत होते. यशोदा शेट्टीकडे विभागीय क्रिडा संकुल मध्ये असलेल्या सुविधांचे शुल्क घेणे आणि बँकेत जमा करणे, वरिष्ठांनी सांगीतलेली इतर कामे हा कार्यभार होता. हर्षकुमार क्षिरसागर यांच्याकडे विभागीय क्रिडा संकुल समितीचे पत्र व्यवहार आणि संगणक चालक म्हणून जी काही इतर कामे असतील ती सर्व करण्याचा कार्यभार होता. वेव्ह मल्टीसव्र्हीसेस मार्फत या दोन्ही कंत्राटी कर्मचा–यांची नियुक्ती केलेली होती.

२. मला पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी प्रथम दिनांक २२.१२.२०२४ रोजी पंच म्हणून यशोदा शेट्टी यांना अटक केली त्याचा पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. पोलीसांनी यशोदा शेट्टी यांना माझ्या समक्ष अटक केली. त्याचा पंचनामा माझ्यसमक्ष केला. तो पंचनामा मला आता दाखविला. तो हाच पंचनामा आहे. यावर माझी सही आहे. यातील मजकुर खरा व बरोबर आहे. या पंचनाम्यास **निशाणी क्रमांक १९०** देण्यात येत आहे.

**३**. त्यानंतर पोलीसांनी मला दिनांक २८.१२.२०२४ रोजी अर्पीता वाडकर यांच्या अटकेचा पंचनामा करण्यासाठी मला बोलविण्यात आले होते. पोलीसांनी अर्पीता वाडकर यांना माझ्या समक्ष अटक केली. त्याचा पंचनामा माझ्यसमक्ष केला. तो पंचनामा मला आता दाखविला. तो हाच पंचनामा आहे. यावर माझी सही आहे. यातील मजकुर खरा व बरोबर आहे. या पंचनाम्यास **<u>निशाणी क्रमांक १९१</u>** देण्यात येत आहे.

**४**. त्यानंतर अर्पीताकडे चौकशीमध्ये काही वस्तू पोलीसांनी जप्त केल्या. या सर्व वस्तु पोलीसांना अर्पीताने दाखविल्या त्यावेळेला मी तेथे होते. पोलीसांनी ह्या वस्तु मला पंच म्हणून दाखविल्या व त्याचा जप्ती पंचनामा हा पंचनामा दिनांक २८.१२.२०२४ रोजी माझ्या समक्ष झाला. अर्पीताकडुन जवळपास ११ वस्तु जप्त झाल्या होत्या. तो पंचनामा मला आता दाखविला. तो हाच पंचनामा आहे. यावर माझी अनुक्रमांक-१ वर सही आहे. त्या दिवशी माझ्या सोबत दुसरे पंच श्री. दिनेश मिसाळ हे होते. या पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. या पंचनाम्यास **<u>निशाणी क्रमांक १९२</u>** देण्यात येत आहे. अर्पीताकडुन माझ्या समक्ष एक सॅमसंग कंपनीचा फोल्डींगचा फोन, एक आय फोन, एक एच.डी.एफ.सी बँकेचे रुपे कार्ड होते, एच.डी.एफ.सी बँकेचे प्लाटीनम कार्ड होते, एच.डी.एफ.सी बँकेचे एक पासबुक होते, आय.सी.आय.सी. आय. बँकेचे एक डेबीट कार्ड आणि एक चेकबुक असे होते, एक स्कोडा गाडीचे आर.सी. बुक होते ते अर्पीताच्या नावावर होते, एक त्रीशुल अपार्टमेंट नवी मुंबई येथील दुस-या मजल्यावरील सदनिकेचे नोंदणीकृत करारनामा, पावती व इंडेक्स-२ उता-यासह जे हर्षकुमार क्षिरसागर या नावे होती, एक त्रीशुल अपार्टमेंटचे मेंटनेन्स चे बील हर्षकुमार क्षिरसागर यांच्या नावे होते, या त्रीशुल अपार्टमेंट मधील सदनिकेचे गिरीजा फर्नीचर एन्टरप्राईजेस यांनी दिलेले कोटेशन होते अशा वस्तु होत्या. या सर्व ह्या पंचनाम्याने जप्त केल्या. हा जप्ती पंचनामा संध्याकाळी ०४:४५ ते ०४:५० वाजता सुरू होऊन साधारण ०५.३० वाजेच्या दरम्यान संपला. या जप्त वस्तु मला जर आता दाखविल्या तर मी ओळखेल. त्या वस्तु खालील प्रमाणे आहेत:-

१. समक्ष एक सॅमसंग कंपनीचा फोल्डींगचा फोन मला आता दाखविला तो हाच आहे, याला **<u>मुद्देमाल आर्टीकल-'A-1'</u>** देण्यात येत आहे.

२. एक आय फोन मला आता दाखविला तो हाच आहे, याला **<u>मुद्देमाल आर्टीकल-'A-2'</u>** देण्यात येत आहे.

३. एच.डी.एफ.सी बँकेचे प्लाटीनम कार्ड मला आता दाखविले ते हेच आहे, याला **<u>मुद्देमाल आर्टीकल-'A-3'</u>** देण्यात येत आहे.

४. एक एच.डी.एफ.सी बँकेचे रुपे कार्ड मला आता दाखविले ते हेच आहे, याला **<u>मुद्देमाल आर्टीकल-'A-4'</u>** देण्यात येत आहे.

५. एच.डी.एफ.सी. बँकेचे एक पासबुक मला आता दाखविले ते हेच आहे, याला **<u>मुद्देमाल आर्टीकल-'A-5'</u>** देण्यात येत आहे.

६. आय.सी.आय.सी.आय बँकेचे एक चेकबुक मला आता दाखविले ते हेच आहे, याला **<u>मुद्देमाल आर्टीकल-'A-6'</u>** देण्यात येत आहे.

7. आय.सी.आय.सी.आय. बँकेचे एक डेबीट कार्ड मला आता दाखविले ते हेच आहे, याला **मुद्देमाल आर्टीकल–'A–7'** देण्यात येत आहे.

८. एक स्कोडा गाडीचे आर.सी. बुक होते ते अर्पीता सुनिल वाडकरच्या नावावर होते मला आता दाखविले ते हेच आहे, याला **मुद्देमाल आर्टीकल–'A–8'** देण्यात येत आहे.

९. एक त्रीशुल अपार्टमेंट नवी मुंबई येथील दुस–या मजल्यावरील सदनिकेचे नोंदणीकृत करारनामा, पावती व इंडेक्स–२ उता–यासह जे हर्षकुमार या नावे होते, मला आता दाखविले ते हेच आहे, याला **मुद्देमाल आर्टीकल–'A–9'** देण्यात येत आहे.

१०. एक त्रीशुल अपार्टमेंटचे मेंटनेन्स चे बील हर्षकुमार क्षिरसागर यांच्या नावे होते, मला आता दाखविले ते हेच आहे, याला **मुद्देमाल आर्टीकल–'A–10'** देण्यात येत आहे.

११. या त्रीशुल अपार्टमेंट मधील सदनिकेचे गिरीजा फर्नीचर एन्टंरप्राईजेस यांनी दिलेले कोटेशन, मला आता दाखविले ते हेच आहे, याला **मुद्देमाल आर्टीकल–'A–11'** देण्यात येत आहे.

**५**. दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजी मला पुन्हा पोलीसांनी बोलाविले होते. मला पोलीसांनी आर्थीक गुन्हे शाखेत बोलाविले होते. तेथे मनिषा क्षिरसागर, हर्षकुमार क्षिरसागरच्या आई यांना अटक केली. त्यासाठी पंच म्हणून मला बोलाविले होते. त्याचा अटक पंचनामा माझ्या समक्ष केला. तो पंचनामा मला आता दाखविला. तो हाच पंचनामा आहे. यावर माझी सही आहे. यातील मजकुर खरा व बरोबर आहे. या पंचनाम्यास **निशाणी क्रमांक १९३** देण्यात येत आहे.

**६**. दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी मला माझा जबाब नोंदविण्यासाठी आर्थीक गुन्हे शाखेकडुन नोटीस आली होती. त्याच दिवशी मी तेथे जाऊन आर्थीक गुन्हे शाखेत माझा जबाब नोंदविला होता. मला आता ती नोटीस दाखविली. ती हीच आहे. यावर मला नोटीस मिळाली म्हणून सही आहे. या नोटीसला **निशाणी क्रमांक १९४** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझ्याकडे मी काय म्हणून काम करते व कार्यालयात कोण कोण काम करतात, त्याचा पदभार काय, याबाबत माझ्याकडे पोलीसांनी चौकशी केली होती. मी पोलीसांना असे सांगीतले की, श्री. संजय सबनिस यांनी एका टेंडरसाठी बँक स्टेटमेंट मागविले होते व त्या स्टेटमेंटवरून अपहार झाल्याचे समजले होते. श्री. संजय सबनिस यांनी पत्र देऊन व स्वतः चौकशी जाऊन इंडीयन बँकेत चौकशी केली. त्यावेळेला असे लक्षात आले की, रक्कम रुपये २१ कोटी ५९ लाख रुपयांचा अपहार झालेला आहे. चौकशी नंतर मला असे समजले की, बँकेच्या खात्याचा नेट बँकींगचा नंबर बदलला व तो हर्षकुमार क्षिरसागर याचा होता. त्यानंतर आमच्या कार्यालयाने हर्षकुमार क्षिरसागर आणि यशोदा शेट्टी यांच्या विरुध्द पोलीसांत तक्रार केली. स्वप्नील तांगडे यांच्या हाताखाली हे दोघे काम करीत होते, त्यामुळे त्यांना सुध्दा अटक झाली.

**७**. दिनांक ०३.०२.२०२५ रोजी मला एक महिला पंच म्हणून पोलीसांकडुन परत बोलविण्यात आले. मला, ड्रीम होम, आयप्पा मंदीर, बीड बायपासरोड, औरंगाबाद येथे बोलविण्यात आले होते. पोलीसांनी मला ज्या घरात बोलाविले होते ते घर हर्षकुमार क्षिरसागरच्या नावे होते. माझ्यासोबत दुसरे पंच श्री. दिनेश मिसाळ हे होते. ही सदनिका बी–9 या क्रमांकाची होती. मला ही सदनिका मला श्री. श्रीकांत जगदाळे यांनी दाखविली. तेथे पोलीसांनी माझ्या समक्ष पाहणी करून वस्तु जप्त केल्या. माझ्या समक्ष एकदंरीत एकूण १४

**निशाणी क्र.१८९/ क**

(चौदा) वस्तु जप्त केल्या. या सर्व वस्तू आम्हाला दाखवून त्याचा जप्ती पंचनामा तयार केला व तो आम्हाला दाखविला. त्यावर वाचून बरोबर आहे हे पाहून मी सही केली. मला आता हा पंचनामा दाखविला. तो हाच आहे. यावर माझी पंच क्र.१ म्हणून सही असून माझी सही पान क्रमांक–१ वर सुध्दा आहे. या पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. यावर दुसरे पंच म्हणून श्री. दिनेश मिसाळ यांची सही आहे. हा पंचनामा साधारण दुपारी ०१:१५ ते ०१:३० वाजेच्या दरम्यान सुरू होऊन संध्याकाळी ०५:३० वाजेच्या सुमारास संपला. या पंचनाम्यास **निशाणी क्रमांक १९५** देण्यात येत आहे.

८. या जप्त वस्तुंमध्ये सॅमसंग कंपनीचा एक डिश वॉशर होता जो सिल पॅक होता, एक सॅमसंग कंपनीचा एलईडी टीव्ही, एक सॅमसंग कंपनीचा फ्रीज, एल.जी. कंपनीचे काही प्रॉडक्ट पैकी दोन ड्युअल इन्हर्टरचे दोन ए.सी., एक एल.जी. कंपनीचा स्पीकर सिस्टीम, एक डिश वॉशर एल.जी.कंपनीचा, एक मॅट्रेस स्लीप कंपनीची, एक मिक्सर क्रोमा कंपनीचा, एक एलिका कंपनीचा किचन हुड (चिमणी), एलिका कंपनीच्या तीन व चार बर्नर असलेल्या दोन शेगड्या, एक मायक्रो ओव्हन एलिका कंपनीचा, एक इन्हर्टर एमेरॉन कंपनीचे व बॅटरी मायक्रोटेक होती, एक एअरटेल कंपनीचा वायफाय राऊटर होता, एक होंडा शाईन दुचाकी वाहन व एक होंडा एक्टीव्हा दुचाकी वाहन होते, मला या वस्तुंचे फोटो दाखविल्यास मी ओळखेल.

९. मी हर्षकुमार क्षिरसागर, यशोदा शेट्टी व स्वप्नील तांगडे यांना पाहिल्यास ओळखेल. स्वप्नील तांगडे आज गैरहजर आहे (आज रोजी स्वप्नील तांगडे याचा गैरहजेरी माफीचा अर्ज मंजुर), हर्षकुमार क्षिरसागर आणि यशोदा शेट्टी हे व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे हजर असल्याचे स्क्रीनवर दिसत आहे. (या प्रकरणातील सर्व तुरुंगात असलेले न्यायबंदी आज रोजी व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे हजर आहेत). मनिषा क्षिरसागर यासुद्धा व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे हजर आहेत. आज रोजी आरोपी अर्पीता वाडकर यासुध्दा प्रत्यक्ष हजर आहे. या सर्वांना मी ओळखते.

**(जप्त वस्तुंचे फोटो हजर नसल्यामुळे तेवढ्या कारणांपुरता सरतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.)**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |
| दिनांक– १४/०१/२०२६ | |